**<u>ठळक बातम्या</u>**

- तेलवाहतुकीसाठी वापरात येणारी होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रस्ताव इराणच्या संसदेत मंजूररक

- इराण - इस्त्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ/ भारताकडे पुरेसा तेलसाठा असल्याचा हरदिपसिंग पुरी यांचा विश्वास

- संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त मुंबईत विधान भवनात राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

**आणि**

- ऑलिंपिक पदक विजेता हॉकीपटू ललित उपाध्यायची आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा

<><><><><>

इराण आणि इस्त्रायलमध्ये अद्याप संघर्ष सुरु आहे. अमेरिकेनं काल इराणवर हल्ला केल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी इस्त्रायलवर हल्ले सुरु ठेवणार असल्याचं म्हटलं आहे. इस्त्रायलनं मोठी चूक केली असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. इराणच्या संसदेनं फोर्डो, नटान्झ आणि इस्फहान इथल्या इराणी अणुआस्थापनांवर अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जगातील सर्वात महत्त्वाचा तेल आणि वायू वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रस्ताव एकमतानं मंजूर केला आहे. या मार्गावरची सागरी वाहतुक बंद करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अंतिम अधिकार इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेकडे आहे. या परिषदेनं अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी या निर्णयामुळे जागतिक स्तरावर तेलाची किंमत प्रति बॅरल शंभर डॉलर्सच्या वर जाऊ शकते. दरम्यान,

अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांनी अत्यंत सावधगिरीने या भागात लष्करी दल तैनात केलं आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघचित आज रशियाला पोहोचले. अमेरिकेच्या लष्करी कारवाईनंतर ते रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची शक्यता आहे. इराणमध्ये सत्ता बदलण्याची शक्यता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वर्तवली आहे. ऑस्ट्रेलियन परराष्ट्र मंत्री पेनी वोंग यांनी इराणवर हल्ला करण्याच्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे.

<><><><><>

अमेरिकेने इराणवर हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमतीमधे आज वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूड ऑईलची किंमत दोन टक्क्यानी वाढून ७९ डॉलर प्रति बॅरल इतकी झाली आहे तर डब्ल्यूटीआय क्रूड ऑईलची किंमत ७५ डॉलर प्रति बॅरल इतकी झाली आहे. गेल्या पाच महिन्यातली ही सर्वोच्च वाढ आहे. मध्य आशियामधे सुरू असलेल्या संघर्षामुळे तेलाच्या किमतीत सलग तिसऱ्या आठवड्यात वाढ झाली आहे. इराणने जगातला सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुजच्या समुद्रधुनीला बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे तेलाच्या किमती अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

<><><><><>

भारताकडे तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध असून गेल्या दोन आठवड्यातील पश्चिम आशिया भागातल्या भुराजकीय परिस्थितीकडे भारत सरकार बारकाईनं लक्ष ठेवून आहे, असं केंद्रिय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या कच्च्या तेल आयाती संदर्भातील पुरवठा साखळीत विविधता आणली आहे आणि आता होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणात पुरवठा होत नाही. तसंच भारतीय तेल विपणन

कंपन्यांकडे अनेक आठवडे पुरेल एवढा तेल साठा उपलब्ध आहे. भारतीय नागरिकांना इंधनाचा पुरवठा स्थिर राहावा यासाठी सरकार सर्व आवश्यक पावलं उचलत आहे, अशी माहिती त्यांनी या संदेशात दिली आहे.

**<><><><>**

इराणवर अमेरिकेनं काल केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्राच्या न्यू यॉर्कमधील मुख्यालयात सुरक्षा परिषदेचं आपत्कालीन विशेष सत्र काल पार पडलं. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी या भागात शांतता प्रस्थापित करण्याचं आवाहन केलं. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था अर्थात IAEA च्या निरीक्षकांनी इराण अणुकार्यक्रमासाठी विश्वसनीय, व्यापक आणि पडताळणीयोग्य उपाय; शोधण्यासाठी प्रयत्न करावेत असंही त्यांनी आवाहन केलं. रशिया, चीन आणि पाकिस्तानने सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक बोलावून तात्काळ आणि बिनशर्त युद्धबंदीची मागणी करणारा ठराव मांडला. तेहरानला अमेरिकेनं केलेल्या आक्रमणाविरुद्ध स्वतःचं रक्षण करण्याचा अधिकार आहे, असं या परिषदेत इराणचे प्रतिनिधी अमीर सईद इरावनी यांनी सांगितलं. अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे जग अधिक सुरक्षित झालं आहे, त्यामुळे निषेधाचा ठराव आपण नाकारत असल्याचं इस्रायलचे संयुक्त राष्ट्रातील राजदूत डॅनन यांनी सांगितलं. तर चीनने अमेरिकेच्या हल्ल्यांचा निषेध केला आहे.

**<><><><>**

इराणच्या अणुप्रकल्पांवर अमेरिकेनं केलेल्या हल्ल्यांनंतर ब्रिटनचे प्रधानमंत्री किअर स्टार्मर यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी आज चर्चा केली. दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणात, इराणने शक्य तितक्या लवकर चर्चेसाठी सहमती दर्शवावी आणि कायमस्वरूपी तोडगा काढावा यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला.

**<><><><>**

इराणहून मायदेशी परतलेल्या २८५ प्रवाशांचं परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पबित्र मार्गारिटा यांनी रात्री दिल्ली विमानतळावर स्वागत केलं. ऑपरेशन सिंधु अंतर्गत आतापर्यंत एक हजार ७१३ भारतीयांना मायदेशी आणल्याची माहिती त्यांनी दिली.

इस्रायलमधून घरी परतणाऱ्या श्रीलंकेच्या नागरिकांसाठी भारतानं अम्मान ते नवी दिल्ली या विमानांमध्ये जागा उपलब्ध करुन दिली आहे. इस्रायलमधल्या श्रीलंकेच्या दूतावासानं याची घोषणा केली आहे. तेल अवीव ते अम्मान आणि तेथून दिल्लीला येणाऱ्या विमान सेवा देखील मोफत दिल्या जातील. तथापि, प्रवाशांना नवी दिल्ली ते कोलंबो तिकिटे स्वतःहून घ्यावी लागतील. इस्रायलमधल्या श्रीलंकेच्या दूतावासात आज आणि उद्या नोंदणी सुरू आहे.

**<><><><><>**

संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त मुंबईत राष्ट्रीय परिषद सुरू आहे. या परिषदेचा प्रारंभ आज विधानभवनात झाला. याप्रसंगी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिरला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. अर्थसंकल्पीय अंदाजांची समीक्षा आणि प्रभावी निगराणीसाठी अंदाज समितीची भूमिका हा या कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांच्या प्रवासात आपल्या लोकशाहीने विविध आव्हानांचा सामना केला असून ती आता अधिक मजबूत झाली असल्याची भावना लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी व्यक्त केली. तर लोकशाही राज्यव्यवस्थेत संसद सरकारला नियंत्रणात ठेवण्याचं काम करते आणि हे काम अंदाज समितीच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे केलं जातं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे आज भारतीय शेअर बाजारात घसरण दिसून आली. आयटी आणि ऑटो क्षेत्रात विक्री झाल्याचे थेट परिणाम निर्देशांकांवर झाले. अमेरिकेने इराणच्या आण्विक तळांवर केलेल्या हल्ल्यांनंतर ही घसरण झाली आहे. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ६०० पेक्षा जास्त अंकांची घसरण झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये १५०हून अधिक अंकांची घसरण झाली आहे.

**<><><><><>**

पाच राज्यात झालेल्या विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठीची मतमोजणी आज होणार आहे. गुजरातमधील विसावदार आणि काडी, केरळमधील निलंबुर, पश्चिम बंगालमधील कालिगाणी आणि पंजाबमधील लुधियाणा मतदारसंघांसाठी १९ जून रोजी मतदान झालं होतं.

**<><><><><>**

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या शहीद दिनी आज देश त्यांना श्रद्धांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुखर्जी यांना श्रद्धांजली वाहिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात मोदी म्हणाले की, डॉक्टर मुखर्जी यांनी देशाची अखंडता अबाधित ठेवण्यासाठी अतुलनीय धैर्य दाखवत प्रयत्नांची पराकाष्ठा केली. राष्ट्र उभारणीतलं त्यांचं अमूल्य योगदान नेहमीच आदराने लक्षात ठेवलं जाईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज नवी दिल्ली इथल्या पक्षाच्या मुख्यालयात डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. मुखर्जी हे एक स्वातंत्र्यसेनानी आणि समाजसुधारक होते. त्यांनी जम्मू आणि काश्मीरला दिलेल्या विशेष दर्जाला विरोध केला होता, असं नड्डा माध्यम प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

भारतासाठी हॉकीमध्ये दोनवेळा ऑलिंपिक पदक जिंकणारा ललित उपाध्याय याने आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. भारतानं बेल्जियमविरुद्धच्या FIH प्रो लीग सामन्यात ४-३ असा विजय मिळवत आपला हंगाम संपवला, त्यानंतर लगेचच ललितने समाजमाध्यमावर सर्वांना आपल्या निर्णयाची माहिती दिली. ललित उपाध्यायनं भारतासाठी १८३ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि ६७ गोल केले आहेत. २०१४ च्या हॉकी विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या ललितनं टोकियो २०२० आणि पॅरिस २०२४ ऑलिंपिकमध्ये प्रत्येकी एक कांस्यपदक जिंकलं आहे. भारतीय हॉकीमधल्या योगदानाबद्दल ललितला २०21 मध्ये अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

तेंडुलकर अँडरसन करंडक स्पर्धेच्या लीड्स इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतानं ९६ धावांची आघाडी घेतली आहे. या सामन्यात भारतानं दुसऱ्या डावात २ गडी बाद ९० धावा केल्या. के एल राहुल ४७ आणि कर्णधार शुभमन गिल ६ धावांवर खेळत होते. दुसऱ्या डावाचा आजचा चौथ्या दिवसाचा खेळ दुपारी साडे तीन वाजता सुरू होणार आहे.

**//<><><><><>//**